-: जाहिरात :-

इंटेन्सीव्हीस्ट (Intensivist )

थेट मुलाखत

( WALK IN INTERVIEW )

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैदयकिय विभागाचे अंतर्गत असणा-या रुग्णालयात **रात्रपाळीमध्ये रात्री ८.०० ते सकाळी ८.००** या कामकाजाकरिता इंटेन्सीव्हीस्ट (Intensivist ) या पदकरिता कंत्राटी करारनामा करुन ११ महिने कालावधीसाठी पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेकामी WALK IN INTERVIEW आयोजीत करणेत आलेले आहेत.

१) WALK IN INTERVIEW वेळ व दिनांक २० /११ /२०२५ ते दिनांक २४/ ११ /२०२५ वेळ सकाळी १०.००ते दुपारी ३.०० वा

२) WALK IN INTERVIEW ठिकाण - आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचे कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, दुसरा मजला, वैदयकीय विभाग मुख्य कार्यालय, पिंपरी

तरी इंटेन्सीव्हीस्ट (Intensivist ) पदाकरिता पात्र व इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीस प्रत्यक्ष उपस्थीत रहावे.

| अ.क्र | आवश्यक शैक्षणिक अर्हता | आवश्यक पदे | कंत्राटी वेतन | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | औषधविकार शास्त्र / छातीविकार शास्त्र / भुलशास्त्र / अतिदक्षता विभाग या विषयातील M.D/DNB पदवी / पदविका आवश्यक | एकुण ११ पदे ( नविन थेरगाव रुग्णालय , नविन भोसरी रुग्णालय , कै.प्रभाकर मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालय , तालेरा रुग्णालय , जिजामाता रुग्णालय | र.रु. १,२५,०००/- प्रति महिना (नमुद विषयातील पदवी आवश्यक)<br>र.रु. १,१०,०००/- प्रति महिना नमुद विषयातील पदवीकाधारक उमेदवार ( १ वर्षे अतिदक्षता विभागात काम केलेचा अनुभव आवश्यक )<br>र.रु. १,००,०००/- प्रति महिना नमुद विषयातील पदवीकाधारक ( १ वर्षापेक्षा कमी अनुभव असल्यास ) | अनु . जाती- १<br>अनु. जमाती- १<br>विजा)अ( - १<br>भज-ब - १<br>इमाव - २<br>साशैमाप्र - १<br>आ.दु.घ - १<br>खुला - ३ |

अटी – शर्ती

१. सदर जाहिरात ही प्रारुप गुणवत्ता यादी तयार करुन आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच महापालिकेला गरज भासेल त्याप्रमाणे मार्किंग पॅटर्नानुसार गुणवत्ता यादीमधुन पात्र उमेदवारांची कंत्राटी वेतनावर करारनामा करुन आवश्यक पदांच्या walk in interview द्वारे नियुक्त्या करणेत येतील.

२. सदरची नेमणुक तात्पुरत्या स्वरुपातील असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुसार करण्यात येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दुरध्वनीवर करण्यात येवु नये .

३. सदर पदासाठी वयोमर्यादा ५८ वर्षे आहे.

४. उमेदवारांची पात्रता व अनुभवाच्या मुळ कागदपत्र, एक पासपोर्ट आकाराचा फोटो व १ संपुर्ण छायांकित सत्यप्रतीचा एक संच घेवुन मुलाखतीस हजर रहाणे आवश्यक आहे.

५. अर्ज व मार्किंग पॅटर्न नमुना वैदयकीय विभागात उपलब्ध आहे.

६. उमेदवार मागसवर्गीय असलेल्या जातीचा स्पष्ट उल्लेख करुन अर्जासोबत त्याबाबत पुरावा जोडणे आवश्यक आहे.

७. विहित पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, अपुर्ण / चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडलेल्या नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

८. निवड झालेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यात र.रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर कॉन्ट्रॅक्ट करारनामा नोटराईज्ड करुन दिल्यानंतर सदर उमेदवरांना कंत्राटी नेमणुक दिली जाईल.

९. मुलाखतीसाठी येणा-या उमेदवारांना स्वखर्चाने मुलाखतीसाठी उपस्थीत रहावे लागेल.

१०. उमेदवांराच्या उपलब्धतेनुसार तसेच मनपा रुग्णालयांच्या आवश्यकतेनुसार आरक्षणाची अट शिथील करणेत येईल

११. वरिल पदे ही पुर्णत: कंत्राटी स्वरुपाची असल्याने या पदावर कायम स्वरुपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

१२. वरिल पदासाठी कामाचे स्वरुप ठरविण्याचे सर्वस्वी अधिकार आरोग्य वैदयकीय अधिकारी , वैदयकीय विभाग यांना राहतील.

१३. सदर पदांना नमुद केलेनुसार रुग्णालयाच्या सोईनुसार सेवा देणे बंधनकारक असेल तथापी पदांची कामकाजाची वेळ रात्रपाळी ८.०० ते ८.०० वा. असुन कामकाजानुसार वेळ निश्चित करण्याचे अधिकार आरोग्य वैद्यकीय अधिकारी तसेच रुग्णालय प्रमुख यांचे असतील. तसेच सदर पदांवर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी नमुद रुग्णालयात रात्रपाळीमध्ये कामकाज करणे आवश्यक असेल.

१४. कामकाजाची वेळ दिवसाआड रात्री ८.०० ते सकाळी ८.०० अशी असेल. तसेच एक दिवसाआड कामकाज असलेने साप्ताहिक सुट्टी देय असणार नाही.

१५. आवश्यकता भासली तर आरोग्य वैद्यकीय अधिकारी तसेच रुग्णालय प्रमुख वेळत बदल करु शकतील.

१६. अपात्र ठरविलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. बोलविलेल्या उमेदवारांस नियुक्ती देणेचे सर्व अधिकार मा.आयुक्त सो यांनी राखुन ठेवले आहेत.याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१७. सदर पदांची संख्या जाहिराती मध्ये नमूद केली असून आवश्यकतेनुसार भरण्यात येतील.

१८. मुलाखत स्थगीत व रद्द करणे , अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकारी मा. आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका हे स्वताकडे राखुन ठेवतील त्याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१९. महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील नियमीत कर्मचा-यांच्या लाभदायी योजना , सदर पदांना यांना लागु होणार नाहीत.

२०. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हता धारण न करणारा आढळल्यास,गैरवर्तन करताना आढळल्यास, सेवा देण्यास टाळाटाळ केल्यास, रुग्णालयाची वेळ न पाळल्यास व दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास नियुक्ती रद्द करणेत येईल.

२१. रुग्णालयीन वेळेनुसार थंम्ब इम्प्रेशन करणे बंधनकारक राहील. रुग्णालयीन वेळेत थम्बमध्ये उशीर झाल्यास मनपा नियमानुसार नियमाधिन कारवाई करणेत येईल.

२२. कंत्राटी वेतनावर करारनामा करुन नियुक्त केलेल्या पदाचे काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्व सुचना कार्यालयास देणे बंधनकारक राहिल अन्यथा एक महिन्याचे कंत्राटी वेतन मनपा कोषागारात जमा करणे बंधनकारक राहील. राजीनामा सादर न करता परस्पर काम सोडुन गेल्यास मानधन कपात करणेत येईल.

२३. नियुक्ती संदर्भात अंतिम अधिकार आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी १८ यांना राहतील आणि निवड / नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर , कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करणेचे अधिकार आयुक्त पिंपरी चिंचवड मनपा यांनी राखुन ठेवले आहेत.

२४. सदर जाहिरात पिंपरी चिंचवड महानगरपालिका नोटीस बोर्ड आणि www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

जाहिरात क्रमांक -२८६ दिनांक ०८/०७/२०२५

Digital Signature
Signature valid

Name : SHRAVAN HARDIKAR
Designation:Municipal Commissioner
Location:.
Date :06-11-2025 16:53